महासागर

रविवार दि. 22 सप्टेंबर 2024

अमरावती



# दोन गोदामातून 15 लाख रुपयांचा गुटखा जप्त

## लोहा बाजारातील घटना | नागपुरीगेट पोलिसांची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.21 )-** इतवारा बाजार परिसरातील लोहा बाजारातील दोन गोदामांमधून नागपूरगेट पोलिसांनी लाखो रुपयांचा बंदी असलेला गुटखा जप्त केला आहे. ही कारवाई शनिवारी दुपारी 3.30 वाजता करण्यात आली. घटनास्थळावरून पोलिसांनी विविध कंपन्यांचा 15 लाखांहून अधिक गुटखा जप्त केला आहे. हा गुटखा तीन जणांचा असल्याचे समोर आले आहे. पोलीस सध्या गुटख्याच्या तपासात गुंतले आहेत.

शनिवारी दुपारी इतवारा बाजारातील लोहा बाजार येथील दोन गोदामांमध्ये गुटखा ठेवल्याची गोपनीय माहिती नागपूरगेट पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहोचले. तेथे दोन्ही गोदामांना कुलूप होते. पोलिसांनी संबंधित गोदामाच्या मालकांशी संपर्क साधून गोदामात पोहोचण्यास सांगितले. मात्र गोदाम मालक तेथे पोहोचला नाही. त्यानंतर नागपुरीगेट पोलिसांनी साक्षीदारांसमोर गोदाम उघडले. त्यामध्ये विविध कंपन्यांचा 7 ते 8 पोत्यांचा गुटखा जप्त करण्यात आला. जप्त केलेल्या मालामध्ये पानपराग, पानबहार, बाजीराव, रजनीगंधा यासह विविध प्रकारच्या गुटख्याचा समावेश आहे. हा गुटखा बिलाल, जुनैद आणि हुसैन नावाच्या लोकांचा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. पोलीस निरीक्षक हनुमंत येरलागोंडावार यांच्या नेतृत्वात एएसआय येवतीकर, रणजित गावंडे, आनंद ठाकूर, मंगेश लोखंडे, अशोक वाटाणे, इम्रान, विनोद झाडे, एएसआय सलीम यांनी ही कारवाई केली.

### सक्करसाथ येथे कारमधून गुटखा जप्त

शुक्रवारी सक्करसाथ येथे एक कार बेवारस उभी होती. या गाडीत गुटखा असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक हनुमंत उरलगोंडावार यांना मिळाली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून घटनास्थळाची पाहणी केली. कार लॉक झाल्यामुळे क्रेनच्या साहाय्याने गाडी नागपूरगेट पोलिस ठाण्याच्या आवारात आणण्यात आली. तेथे गेट उघडले असता त्यामध्ये विविध कंपन्यांचा गुटखा आढळून आला. गुटख्याची किंमत अद्याप कळू शकलेली नाही.

### आ.ठाकुर यांनी सीपींकडे मांडला होता गुटख्याचा विषय

आमदार यशोमती ठाकूर यांनी दोन दिवसांपूर्वी पोलिस आयुक्त कार्यालय गाठून शहरात सुरू असलेल्या गुटखा विक्रीवर प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर पोलिसांनी गुटखा विक्रेत्यांवर करडी नजर ठेवण्यास सुरुवात केली आहे. नागपुरीगेट पोलिसांनी दोन दिवसांत दोन कारवाया केल्याने गुटखा विक्रेते व तस्करांमध्ये घबराट पसरली आहे.

# चोरीच्या केबल्स जप्त

## तांबे आणि ॲल्युमिनियमकरिता चोरी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 ) -** येथील महाकाली माता मंदिर परिसरातील श्रीनाथवाडी येथील एका घरातून मोठ्या प्रमाणात चोरीच्या केबल्स जप्त करण्यात आल्या आहेत. गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने शनिवारी दुपारी ही कारवाई केली. या घरामध्ये या केबल्समधून तांबे व ?ल्युमिनियम काढले जात असल्याची माहिती प्राप्त झाली. पोलिसांनी चेतन शर्मा नावाच्या तरुणाची चौकशी केली.

चेतन शर्मा यांचे जवाहरगेट परिसरात दुकान असून, शनिवारी दुपारी श्रीनाथवाडी परिसरातील एका घरात मोठ्या प्रमाणात चोरीची केबल पडून असल्याची गोपनीय माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकला. यामध्ये केबल्स मोठ्या प्रमाणात आढळून आल्या. त्यात केबलचे काही नवीन बंडलही दिसले. याबाबत चेतन शर्मा यांना विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. ही कंपनीची न वापरलेली केबल असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, नवीन बंडल मिळाल्याने हा माल चोरीस गेल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. सध्या मालाची किंमत कळलेली नाही. जप्त केलेल्या मालाची पोलीस चौकशी करीत आहेत.

# उभ्या वाहनावर दुचाकी आदळली, एक ठार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.21 )-** भरधाव दुचाकी उभ्या चारचाकी वाहनावर आदळल्याने एकाचा मृत्यू झाला. राहुल कैलास वंजारी (25, रा. मासोद) असे मृताचे नाव आहे. ही घटना फ्रेजरपूरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणार्या राजुरा नाक्याजवळ शुक्रवारी रात्री घडली.



राहुल कैलास वंजारी हा फ्रेजरपुरा येथून आपले काम आटपून मासोद गावी जात होता. राहुल आपल्या दुचाकीने विद्यापीठ मार्गावरील मासोदकडे जात असताना राजुरा नाक्याजवळ त्याची दुचाकी एका उभ्या चार चाकी वाहनावर धडकली. या अपघातात राहुल वंजारी गंभीर स्वरूपात जखमी झाला. त्याला काही ओळखीतील नागरिकांनी जखमी अवस्थेत औषधोपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. परंतू डॉक्टरांच्या तपासणीत राहुल वंजारीला मृत घोषित करण्यात आले. या घटनेची माहिती मृताच्या नातेवाईकांना देण्यात आली, त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनाकरिता शवगारात ठेवण्यात आला. या घटनेची माहिती फ्रेजरपुरा पोलीसांना देण्यात आली असून पुढील तपास पोलिस करत आहे.

# युवा शेतकऱ्याची आत्महत्या

**चांदुर बाजार-** तालुक्यातील शिरजगाव परिसरात एका युवा शेतकर्याने गळफास लावून आत्महत्या केली. सुमित रामकृष्ण केदार (40) असे मृताचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. ही घटना 21 सप्टेंबर रोजी सकाळी 11 वाजताच्या सुमारास उघडकीस आली. सुमित केदार यांच्याकडील 7 एकर संत्रा बागेचे यंदाच्या पावसामुळे मोठे नुकसान झाले. संत्रा पीक पूर्णपणे उध्वस्त झाल्याने सुमित हे मानसिक तणावात आले होते. त्यामुळेच सुमितने हे पाऊल उचलल्याची चर्चा आहे. सुमितच्या पश्चात पत्नी, मुलगा, आई-वडील, लहान भाऊ असा परिवार आहे. या घटनेची माहिती मिळताच ठाणेदार महेंद्र गवई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनाकरिता अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात पाठविला आहे.

## 39 माजी सैनिकांना 2.45 कोटी रुपयांने गंडविले

**अमरावती -** मालमत्तेतील गुंतवणुकीवर दरमहा 3 टक्के व्याज देण्याचे आमिष दाखवून 39 माजी सैनिकांचे कोट्यवधी रुपये घेऊन पळून गेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी प्रमोद सुखदेवराव महाजन (53, रा. ग्रेटर कैलास नगर, महादेवखोरी) यांच्या फिर्यादीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी आरोपी सुधीर निरंजन चक्रे (48, रा. व्यंकय्यपुरा, अमरावती) व एका महिलेविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# घरासमोर उभी दुचाकी पेटविली

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )-** फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील किरण नगर गल्ली क्रमांक 1 येथील एका घरासमोरील दुचाकीला आग लावण्यात आल्याची घटना 19 सप्टेंबर रोजी उघडकीस आली. याप्रकरणात अनूप प्रकाशराव घोडमारे (36) यांच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी अनिकेत उर्फ चेतन हरिदास चौधरी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

अनुप घोडमारे हे अपघातात दिव्यांग झाले. दरम्यान अनूपच्या आईच्या बहिणीचा मुलगा अनिकेत उर्फ चेतन हरिदास चौधरी त्याचा राग करू लागला. अनिकेतने एकदा अनुपला मारहाण सुध्दा केली होती. याबाबत अनूपने फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात तक्रार केली होती. त्यानंतर अनिकेत पसार झाला होता. अशातच 19 सप्टेंबर रोजी याच वादातून अनिकेतने अनूप यांच्या घरासमोर उभी असलेली दुचाकी पेटवून दिली. ज्यामध्ये दुचाकी जळून खाक झाली. त्यामुळे अनूप घोडमारे यांच्या फिर्यादीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी चेतन हरिदास चौधरी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# चर्चा फिस्कटली, संप अटळ?

## आरटीओ कर्मचारी संघटनांनी भरला हुंकार | 24 सप्टेंबर पासून बेमुदत संप अटळ



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )-** आपल्या विविध मागण्यांकरिता बेमुदत संपावर जाण्याचा निर्धार केलेल्या

मोटार वाहन विभाग आरटीओ कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी मुंबई येथे परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी बैठक घेवून चर्चा केली. मात्र ही चर्चा फिस्कटल्याने आरटीओ कर्मचारी संघटनेने पुन्हा हूंकार भरत संपाची भूमिका कायम ठेवली आहे.

गेल्या दोन वर्षात प्रशासकीय विविध अन्यायकारक तरतुदीमुळे अनेक सेवाविषयक प्रशासकीय गुंतागुंत निर्माण झाली आहे. महसूल विभागीय बदल्याचे धोरण रद्द न करणे, समायोजन करून कर्मचाऱ्यांना भयभीत केले, विभागीय परीक्षा सारख्या संवेदनशील क्षेत्रात अनाकलनीय बदल केले, त्यामुळे राज्यातील कर्मचारी हवालदिल झाले आहेत. आकृतीबंधाची सुयोग्य अंमलबजावणी न करणे, कामकाजात सुसूत्रीकरण येण्यासाठी नेमण्यात आलेल्या कळस्कर समितीच्या हितकारक कार्यपद्धतीची अंमलबजावणी न करणे, विभागीय स्तरावरील आस्थापना विषयक ज्येष्ठता व बदल्याचे संयोजन याबाबत कोणतीही कर्मचारीभिमुक सकारात्मक कार्यवाही झाली नाही, त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील आरटीओ कर्मचारी संतप्त होऊन दि.24 सप्टेंबर 2024 पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्धार पक्का केला आहे. आगामी संप , आंदोलनाची नोटीस परिवहन आयुक्त व प्रधान सचिव (परिवहन) यांना देण्यात आलेली आहे.

सदर नोटीसीच्या पार्श्वभूमीवर प्रलंबित मागण्यावर निर्णयात्मक चर्चा करण्यासाठी मुंबईत परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी त्यांच्या दालनात संघटना प्रतिनिधीसह चर्चा घडवून आणण्यासाठी बैठकीचे आयोजन केले होते. आश्वासनाशिवाय कोणतीही सकारात्मक चर्चा न झाल्याने बैठक निष्फळ ठरली. यापूर्वीही अशा चर्चासत्राचा अनुभव संघटनेला असल्याने केवळ आश्वासने देऊन वेळ मारून नेण्याचा प्रशासनाचा उद्देश या चर्चेत दिसून येत होता.

### 50 कोटीच्या वर बुडणार महसूल

वाहना संदर्भात दैनंदिन होणारे सर्व कामे ठप्प पडल्याने शासनास दर दिवसाला प्राप्त होणाऱ्या 50 कोटीच्यावर महसुलापासून वंचित रहावे लागेल. राज्यातील आरटीओ कार्यालय तसेच राज्यात विविध ठिकाणी उभारलेल्या सीमा तपासणी नाके यावर सुद्धा कर्मचारी संपावर जाणार असल्याने कामकाजावर प्रचंड मोठा फरक पडणार आहे. यामुळे राज्य शासनाच्या महसुलाची हानी होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. अशी माहिती मोटर वाहन विभाग कर्मचारी संघटनेकडून देण्यात आली आहे.

> जोपर्यंत संघटनेने केलेल्या मागणी संदर्भातील कार्यवाही संबंधात लेखी स्वरुपात पत्र दिले जात नाही, तोपर्यंत संपाबाबत कोणताही पुनर्विचार न करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे.
>
> **अनिल मानकर,**
> **राज्य उपाध्यक्ष,**
> **मोटार वाहन विभाग आरटीओ कर्मचारी संघटना.**


महाराष्ट्र शासन

**जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालय, जिल्हा अमरावती.**

क्र.प्र.अ./भू.सं./अ.का./कावि ६२७/२०२४ दिनांक ०६/०८/२०२४

"कलम-१९"

घोषणा

(भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)

भु.सं.प्र.क्र. ०१/४७/२०२३-२४, मौजा पर्वतापुर, ता.व जिल्हा. अमरावती

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांनी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोटकलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसुचना क्र.७९७/२०२३ दि.२५/१०/२०२३ अन्वये प्रारंभीक अधिसुचना काढलेली आहे आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनूसुचि एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसुचि दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, अमरावती जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांनी, कलम १५ च्या पोट कलम (२) अन्वेय दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत

प्रायोजनासाठी 'बुडीत क्षेत्र' म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले असुन, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे. आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियामान्वये जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अ.व.प्र.क्र. ४, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

**गांव- पर्वतापूर तालुका- अमरावती जिल्हा- अमरावती**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर/ गट नंबर | सं.मो. प्रमाणे क्षेत्र (हेक्टर आर मध्ये) | | अ.क्र. | सर्व्हे नंबर/ गट नंबर | सं.मो. प्रमाणे क्षेत्र (हेक्टर आर मध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४६/१ | ०.७८ | | ७ | १२/२ | ०.२५ |
| २ | ४६/३ | ०.५९ | | ८ | १२/३ | ०.२५ |
| ३ | ४६/४ | ०.६१ | | ९ | १२/४ | ०.२५ |
| ४ | ११/१ | ०.२४ | | १० | १२/४ अ | ०.२० |
| ५ | ११/१ अ | ०.१५ | | ११ | १२/५ | २.३६ |
| ६ | १२/१ | ०.३६ | | - | - | - |
| | | एकूण | | | | ४.०४ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण : पेढी बॅरेज उपसा सिंचन योजना प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राकरीता

प्रकल्पाचे नांव : पेढी बॅरेज उपसा सिंचन योजना प्रकल्प.

प्रकल्प कार्याचे वर्णन : पेढी बॅरेज उपसा सिंचन योजना प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राच्या कामाकरीता भूसंपादन करणे.

सामाजिक मिळणारा लाभ :- पेढी बॅरेज उपसा सिंचन योजना प्रकल्पाच्या संपादनामुळे भुधारकांना आर्थिक लाभ मिळणार असुन शेतकऱ्यांचे जिवनमान उंचवणार आहे.

अनुसूची- तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गांव- निरंक तालुका- निरंक जिल्हा - निरंक

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित संपादन क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|
| निरंक | | |

अनुसूची- चार

(पुनवर्सन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

(निरंक)

टिप :- उक्त जमिनीच्या आराखड्याचे भूसंपादन अधिकारी अ.व.प्र.क्र. ४ अमरावती यांच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :- ०६/०८/२०२४

ठिकाण :- अमरावती

**उपजिल्हाधिकारी ( भूसंपादन )**
**अ.व.प्र.क्र. -४ अमरावती**

**( सौरभ कटियार )**
**जिल्हाधिकारी अमरावती**

**जिमाका/अम./जाहि./८०/२०२४**

# मेळघाटात पुन्हा माता मृत्यू

## मातेच्या पोटात बाळही दगावले




**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.21 )**- चिखलदरा तालुक्यातील भंडोरा येथील 27 वर्षीय गर्भवती विवाहितेचा शनिवारी(दि.21) दुपारी 1 वाजता अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू झाला. ही विवाहिता 8 महिन्यांची गर्भवती होती, तिच्यासह तिच्या पोटातील बाळही यावेळी दगाविले.

मेळघाटात माता आणि बालमृत्यू रोखण्याकरिता आरोग्य विभाग प्रयत्नरत असतानाही माता व बालमृत्यूचा शाप पुसताना दिसत नाहीत. गेल्या चार महिन्यात मेळघाटात अर्धा डझनहून अधिक माता व बालमृत्यू झाले आहेत. शिला अरविंद भूसूम(वय 27 रा. भंडोरा) असे मरण पावलेल्या गर्भवती मातेचे नाव आहे. हिला जिल्हा स्त्री रुग्णालयातून जिल्हा सामान्य रुग्णालयात रेफर करण्यात आले होते, जेथे उपचारादरम्यान शनिवारी तिचा मृत्यू झाला. आरोग्य विभागाकडून प्राप्त माहितीनूसार ती चौथ्यांदा गर्भवती होती, तिच्या अंगात फक्त 2 ते 3 टक्के हिमोग्लोबीन उरले होते आणि ती सिकलसेल या आजाराने‌ग्रस्त होती, त्यामूळे तिचा मृत्यू झाल्याचे कारण समोर आले आहे.

# तापमान 34 डिग्रीवर, उकाड्याने नागरिक हैराण

## पावसाच्या अंतीम टप्प्यात पाऊसच गायब

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 21 )** - सप्टेंबर महिन्यातील सुरुवातीचे 5 ते 6 दिवस सतत पावसाचा जोर कायम होता. परंतू त्यानंतर आतापर्यंत जेमतेम दोन ते तीन वेळाच पाऊस पडला आहे. त्यामुळे सुर्य प्रकाशाची प्रखरता वाढल्याने तापमानातही सातत्याने वाढ होत आहे. जिल्ह्याचे सरासरी कमाल तापमान 34.8 डीग्री सेल्सिअसवर पोहोचले आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक अस्वस्थ झाला असून, उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राच्या दैनंदिन अहवालानुसार, शुक्रवारी



अमरावती जिल्ह्याचे सरासरी कमाल तापमान 34.8 अंश सेल्सिअस होते. तर गुरुवारचा पारा 33.8 अंश आणि बुधवारचा 30.4 अंशांवर तापमान होते. तसेच सरासरी किमान तापमान 21 ते 24 अंश होते. त्यामुळे दिवसभर उन्हाच्या वातावरणामुळे पंख्याशिवाय बसणेही कठीण झाले आहे.

**अमरावती जिल्ह्याचे सरासरी कमाल तापमान ( अंश सेल्सिअसमध्ये )**

| तारीख | तापमान |
|---|---|
| 18 सप्टेंबर | 30.4 अंश |
| 19 सप्टेंबर | 33.8 अंश |
| 20 सप्टेंबर | 34.8 अंश |

### 22 पासून येलो अलर्ट

येत्या काही दिवसांत मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करत हवामान खात्याने 22 सप्टेंबरपासून दोन-तीन दिवस येलो अलर्ट दिला आहे. दरम्यान शुक्रवारी दुपारी काही वेळापुरता रिमझीम पाऊस पडला.

### 25 ला धरणे आंदोलन

**अमरावती** - ओबीसी विद्यार्थ्यांसाठीचे स्वतंत्र वसतीगृह अद्यावत सोयी सुविधा करून सुरू करण्यात यावे या मागणीसाठी तसेच अंतरवाली सराटी जि. जालना येथे ओबीसी, भटक्या विमुक्त जाती जमातीच्या वतीने आरक्षण बचाव आमरण उपोषण सुरू आहे.

# चांदुररेल्वेत निघाला देशी कट्टा



**आरोपींविरुध्द गुन्हा दाखल**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.21 )** - चांदुररेल्वे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील टांगा चौक परिसरात दोन तरुणांवर देशी कट्टा उगारला. परंतू देशी कट्ट्यातील काडतुस खाली पडले. त्यामुळे आरोपींनी लोखंडी देशी कट्ट्याचा मागील भागाने दोन्ही तरुणांना मारहाण केली. या हल्ल्यात देशी कट्ट्याचा लोखंडी भाग लागून दोन्ही तरुण जखमी झाले. संदिप प्रभाकर शेंडे (35) व रोहीत विजयराव घोरपडे (27. दोन्ही रा. चांदुररेल्वे) अशी जखमींची नावे आहेत. ही घटना चांदुररेल्वेतील टांगा चौकात 20 सप्टेंबर रोजी रात्री 9.30 वाजताच्या सुमारास घडली. दोन्ही जखमींना प्रथम चांदुररेल्वे उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले होते. तेथून त्यांना अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात रेफर करण्यात आले.

### दोन तलवारी जप्त

**अमरावती** - स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पुर्णानगर (आसेगाव पुर्णा) येथुन एका आरोपीला अटक करून, त्याच्या ताब्यातून दोन धारदार तलवारी जप्त केल्या आहेत. अजय सुभाष वानखडे (23, रा. पुर्णानगर, ता. चांदुरबाजार) असे आरोपीचे नाव आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने अजय वानखडे याच्या पुर्णानगरातील घरी पंचासमक्ष जावुन झडती घेतली. त्यावेळी त्याच्या घरात तलवारी आढळल्या.

# युवकांवर शस्त्राने हल्ला

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि.21 )** -तालुक्यातील जळगाव आर्वी येथील काही युवकांवर गणपती विसर्जनादरम्यान धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. ही घटना 20 सप्टेंबर रोजी घटली.

फिर्यादी मजोज काकडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार फिर्यादी आणि त्यांचे सहकारी गावातील गणपती मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी कौडण्यपूर येथे गेले असता तेथील काही युवकांनी त्यांना मूर्ती नदीत विसर्जन करण्यासाठी मज्जाव केला. याच कारणाहून काही लोकांनी हातात धारदार शस्त्र आणि लाकडी लाठी घेऊन आले आणि फिर्यादी व त्यांच्या सहकार्यांना मारायला सुरुवात केली. त्यामध्ये सोबत असलेल्या ऋषीकेश प्रवीण शेळके, धिरज प्रल्हाद मुळे, जगदिश रविन्द्र शेळके, प्रणय राजेन्द्र शेळके, मनोज भास्कर काकडे, सर्व रा. जळगाव आर्मी यांचेवर धारदार शस्त्राने व लाठीने हल्ला चढविला या प्रकरणात केवलसिंग पटवा वय 21 रा. आर्वी, भ संग्रामसिंग बावरी वय 21 वर्ष रा. देउरवाडा, प्रणय बुलबुले 21 वर्ष रा.आर्वी, आदित्य डाखोडे वर्ष 19 वर्ष रा. देऊरवाडा, हंसराज कठाणे 22 वर्ष रा. कर्माबाद यांना अटक केली आहे. यांच्यावर भादंवि 189 (1)(2)(4), 191 (3), 190, 109, 118 (1) आणि 352 कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शांततेत पार पडले शहरातील गणेश विसर्जन

## दर्यापूर शहरात गुलालाची मनसोक्त उधळण



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.21 )**- गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या' च्या गजरात दर्यापूर येथील विविध मंडळाकडून गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. ढोल, ताशे, लाऊडस्पिकरसह विविध वाद्यांचा मिरवणुकीमध्ये समावेश होता.

विसर्जन मिरवणुका शांततेत पार पडाव्यात म्हणून ठाणेदार सुनील वानखडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक विशाल दांदळे यांच्यासह पोलिस दलाचे पथक, होमगार्ड, आदींचा बंदोबस्तामध्ये सहभाग होता. या प्रसंगी विविध मंडळाचे अध्यक्ष, सदस्य कार्यकर्ते, नागरिक, मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनंत चतुर्दशीच्या दिवशी व पुढील दोन दिवस गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यात आले. गणेश विसर्जनाची मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी गणेश मंडळे नागरिकांचे सहकार्य लाभले. भावपूर्ण वातावरणात, ढोल-ताशांच्या गजरात गणेश भक्तांनी गणरायाला पुढच्या वर्षी लवकर येण्याचे निमंत्रण देत निरोप दिला.

# सागर वर पार पडली बारी समाज ओबीसी मोर्चाची बैठक

- बारी समाजाच्या प्रलंबित मागण्यावर करणार योग्य विचार!
- भूपेंद्र यादव, हंसराज अहिर यांचे आश्वासन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.21 )**- आगामी विधानसभा, नगरपरिषद व इतरही निवडणुका पाहता महाराष्ट्रातील संपूर्ण बारी समाज व त्यांच्या असलेल्या समस्या ह्या सोडवण्याचे दृष्टीकोनातून नुकतीच मुंबई येथील सागर बंगल्यावर केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, केंद्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, महाराष्ट्राचे प्रदेश प्रभारी महामंत्री विजय चौधरी, निवडणूक प्रभारी संगमलाल गुप्ता, प्रदेशाध्यक्ष संजय गाते, जिल्हा परिषदेचे माजी आरोग्य सभापती मनोहर सुने, गजानन कोल्हे अखिल भारतीय बारी महासंघाचे अध्यक्ष रमेश घोलप, रमेश याउल यांचे प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली.

याप्रसंगी मनोहर सुने ह्यांनी बारी समाजाच्या राजकीय परिस्थितीत आगामी विधानसभा निवडणुकीत समाजाची आजची, आणि भविष्यातील परिस्थिती व समाजाचे मुख्य औषधी पीक पानपिपरी, मुसळी ह्या पिकांना प्रोत्साहनपर अनुदान मिळावे ह्या बाबींवर विचार होण्याचे दृष्टिकोनातून तसेच समाजाला आगामी विधान सभेत बारी समाजाला प्रतिनिधित्व देण्यासाठी आपली बाजू विषद केली. नुकतीच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ह्यांनी समस्त बारी समाजाचे दैवत श्री संत रुपलाल महाराज ह्यांचे राष्ट्रीय स्मारक, समस्त बारी समाजाचे आर्थिक प्रगतीसाठी आर्थिक विकास मंडळाची केलेली घोषणा याकरिता रमेश घोलप यांनी शासनाचे आभार मानले. घोषित केलेले प्रश्न हे निवडणूकीचे पूर्वी तसा आदेश काढून मंजुरात करून दयावी जेणेकरून समस्त बारी समाज हा द्विधा परिस्थितीत राहणार नाही, अशी मागणी रमेशजी घोलप ह्यांनी उपस्थित मान्यवरांना केली. ह्याप्रसंगी केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराजजी अहिर ह्यांनी समस्त प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी आम्ही पूर्ण प्रयत्न करणार असे उपस्थित समाज बांधवांना आश्वासित केले बैठकीला अशोक वसुले, मनोहर मुरकुटे, किरण सिनकर, अनिल सुने, प्रकाश गुजर, नितीन डकरे, संजय पकडे, प्रफुल कुकडे, ज्ञानेश्वर निचत, रमेशराव याउल, अशोक वसुले, विष्णू बोडके, शेलैश पायघन, प्रदीप बारी, दिनकर तांबोळी, विजय रावत, डॉ.प्रमोद येऊल, विष्णू बोडखे, शोभा बोडखे, केशव बोडखे, सागर कपले, अभिजित तायडे, लक्ष्मण माधवकर, अंकुश खाजोने, शेलेश पायघन, किशोर धर्मे, अशोक अस्वर, रुपेश येऊल, राजेश नागपूरकर, संतोष बारी, वसंत ढगे, संतोष अस्वार, अभय माकोडे, अंनत फुटाणे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# कृ.उ.बा. समितीमध्ये नवीन सोयाबीन खरेदीचा शुभारंभ

## नवीन सोयाबीनला 5051 रुपये प्रति क्विंटल भाव



**महासागर प्रतिनिधी**

**धामणगांव रेल्वे,( दि.21 )** - येथील कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये शुक्रवार (दि.20) रोजी नवीन सोयाबीन खरेदीचा शुभारंभ करण्यात आला. त्याप्रसंगी सोयाबीनला प्रति क्वि 5051 रुपये दर मिळाला. धामणगाव तालुक्यामध्ये सोयाबीनची मोठया प्रमाणात उत्पादन नेहमी होत असते. सभापती कविता श्रीकांत गावंडे यांचे हस्ते नविन सोयाबीन खरेदीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी तालुक्यातील गव्हाफरकाडे येथील शेतकरी रविन्द्र बकाराम रार्घोते यांचे सोयाबीन आडते महेश गंगण यांचे आडत मध्ये खरेदीदार मे. जय माँ ट्रेडर्स (प्रोप्रा मनिष भटटड) यांचे खरेदी मध्ये 5051- रुपये सोयाबीन खरेदीचा शुभारंभ करण्यात आला. तसेच पवन लाहोटी यांचे आडत मध्ये शेतकरी प्रविण रंगराव धोटे, अंजनवती यांप्रसंगी दोन्ही शेतकरी बंधुचा कविता गावंडे यांचे हस्ते शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला समितीचे संचालक रवी भुतडा, दिनेश जगताप, देवराव बमनोटे, मुकुंद माहोरे, राधेश्याम चांडक, प्रमोद रोंघे, गिरीष भुतडा, संगीता गाडे तसेच जिल्हा बँकेचे संचालक श्रीकांत गावंडे तसेच खरेदीदार संजय अग्रवाल, राजेन्द्र अग्रवाल, प्रदीप कुचेरीया, सचिन गंगण, मनिष भट्टड, प्रेमकुमार टावरी, शंकर गांधी, लंकुश दुर्गेकार, मनिष केला यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी बंधु आडते, व्यापारी, हमाल/मापारी उपस्थित होते.

# पोलीस पाटील शहराच्या ठिकाणी गावात मात्र तंटे, बखेडे

## अवैध धंदेही जोमात

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार, ( दि.21 )**- पोलिस पाटील ही एक अशी व्यक्ती आहे, जी गावाच्या सुरक्षा आणि कायदा सुव्यवस्थेची जबाबदारी सांभाळते. पोलीसांचे प्रतिनिधी म्हणून ते गावाची धुरा सांभाळत असतात. गावातील तंटे, बखेडे मिटविण्याकरिता पोलीस पाटलांचा महत्वाची भूमिका असते.

असे असताना काही पोलीस पाटील हे गाव सोडून तालुक्याच्या किंवा शहराच्या ठिकाणी राहत असल्याने गावातील अवैध धंदे आणि कायदा सुव्यवस्था वाऱ्यावर असल्याचे पहायला मिळत आहे. ज्या गावात महिला पोलीस पाटील आहे त्या गावचा कारभार आहे त्यांचे पती पाहत असतात. शांतता समितीला देखील महिला पोलीस पाटील यांच्या जागेवर त्यांचे पती उपस्थित राहत असल्याने नेमकं पोलीस पाटील महिला की त्यांचे पती असा संभ्रम पोलीस विभागात देखील तयार होत आहे.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील पोलीस पाटील हे खूप महत्वाचे घटक आहेत. त्यांच्या कार्यात विविध पारंपरिक आणि आधुनिक भूमिकांचा समावेश आहे, ज्यामुळे ते गावातील पहारेकरी म्हणून ओळखले जाते. पोलीस पाटील हे गावातील रहिवाशांचे एक महत्त्वाचे अंग आहेत. त्यांच्या कर्तव्यात कायद्याचे पालन, गावात शांती ठेवणे, आणि गावकऱ्यांना विविध प्रकारच्या सहाय्य सेवा पुरवणे यांचा समावेश आहे. गावातील कोणत्याही गैरप्रकाराची किंवा कायद्याचा भंग करणाऱ्या घटकांची माहिती ठेवणे, आणि त्यांची माहिती संबंधित पोलीस ठाण्यात देणे हे त्यांच्या कामाचे मुख्य स्वरूप आहे. गावातील पाटील आणि पोलीस पाटील यामध्ये फरक आहे.

पोलीस पाटील पदासाठी महिलांना व विविध इतर जातीधर्मातील सर्व घटकांना आरक्षण देण्यात आले. यामुळे अनेक अनुसूचित जातीच्या उमेदवारांना व महिलांना पोलीस पाटील होण्याची संधी मिळाली आहे. तालुक्यातील काही पोलीस पाटील हे खाजगी तर काही वैयक्तिक आपला व्यवसाय करत आहे. त्यामुळे अचलपूर उपविभागीय अधिकारी अशा पोलीस पाटील यांची माहिती घेऊन त्यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे.

### काय आहेत अटी व शर्ती

- पोलीस पाटील पद स्विकारल्यास खाजगी नोकरी करता येत नाही
- 24 तास गावामध्ये राहावे लागते, गाव सोडून जाता येत नाही.
- पोलीस पाटील स्वत: कोण्या गुन्ह्यात अडकू नये.
- समसमान न्याय भूमिका बजाविणे गरजेचे आहे.

### उच्च शिक्षीत देतात मूलाखती

पोलीस पाटील भरतीमध्ये लेखी परिक्षा आणि मुलाखतीच्या माध्यमातून निवड करण्यात येते. पुर्वी पोलीस पाटलांना फक्त 100 रुपये रोजंदारीवर 24 तास काम करावे लागत होते. मात्र आता पोलीस पाटलांचे मानधन 15 हजारावर पोहोचले आहे. यामुळे उच्चशिक्षित युवक पोलीस पाटील होण्यास तयार होतात. नवीन पोलीस पाटील भरतीमध्ये बी.ए, एम.ए, इंजिनिअर, डीएड झालेले उमेदवार पास झालेले आहे.

# वनाधिकाऱ्याला उपोषणकर्त्याने मागितली दोन लाखांची खंडणी

## बुलडाण्यातील मनसेच्या जिल्हाध्यक्षाविरुध्द गाडगेनगर ठाण्यात गुन्हा दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 21 )** - अमरावतीच्या वनविभागाच्या कार्यालयासमोर आंदोलन करणार्या एका उपोषणकर्त्याने वनाधिकाऱ्याला 2 लाख रुपयांची खंडणी मागितल्याची घटना 19 सप्टेंबर रोजी उघडकीस आली. या प्रकरणात बुलडाणा येथील वनपरिक्षेत्र अधिकारी अभिजित नरहरराव ठाकरे यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी 19 सप्टेंबर रोजी बुलडाणा येथील महाराष्ट्र नवनिर्माण सेनाचे जिल्हा अध्यक्ष शिवा पुरंदरे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल नोंदविला आहे.

तक्रारीनुसार, अभिजित ठाकरे हे बुलडाणा येथे वनपरिक्षेत्र अधिकारी पदावर असून, त्यांना 18 सप्टेंबर रोजी साहाय्यक वनरक्षक यांनी फोनद्वारे कळविले की, 19 सप्टेंबरपासून शिवा पुरंदरे नामक व्यक्ती अमरावती येथील मुख्य वनसंरक्षक कार्यालयासमोर अन्नत्याग आंदोलन करण्यासाठी बसणार आहे. या माहितीच्या आधारे ठाकरे यांनी आंदोलनस्थळी जाऊन पाहणी केली असता, त्या ठिकाणी शिवा पुरंदरे याच्यासोबत आतिश राजे जाधव हे सुध्दा बसलेले होते. त्यांनी त्यांच्याशी चर्चा केली. मात्र, तेथे मोकळी चर्चा करता येत नसल्याने आपण कोठे तरी बोलू, असे ठाकरे यांनी पुरंदरेला सांगितले. माझे घर अमरावतीत आहे. मी येथेच असल्याने त्या घरी बोलू, असे ठाकरे यांनी सांगितले. त्यानंतर ते घरी गेले आणि त्यांनी शिवादादा यांना फोन केला. त्योळी त्यांनी व्हॉटसअप कॉल करा, असे सांगितले. त्यामुळे ठाकरे यांनी आपल्या वडिलांच्या मोबाइलवरून पुरंदरेच्या व्हॉटसअॅपवर फोन केला. त्यावेळी त्यांनी 2 लाख रुपयांची मागणी केली. परंतू ही मागणी माझ्याकडून पूर्ण होणार नाही, असे ठाकरे यांनी पुरंदरेला सांगितले. परंतू पेंडॉल खर्च व जाण्या-येण्या खर्च असे 20 हजार रुपये देतो, असे ठाकरेंनी सांगितले. परंतू त्यांनी सहमती दर्शविली नाही. त्यामुळे शिवादादा हे त्रास देण्यासाठी उपोषणास बसल्याचे लक्षात आले. असे वनपरिक्षेत्र अधिकारी अभिजित ठाकरे यांनी गाडगेनगर ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४